Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- IV APRIL 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण

**प्रा. दत्तराम रामजी रगडे**
ग्रंथपाल
श्री.शिवाजी कॉलेज ऑफआर्ट, कॉमर्स ॲन्ड सायन्स,
कंधार ता.कंधार जि. नांदेड

**१. प्रस्तावणा:**

संशोधकसंशोधन करतांना त्याच्या अगोदरच्या संशोधकांच्या संशोधनाचा आधार घेत असतो.त्या संदर्भाचे उल्लेख संशोधनात करतांना वेगवेगळया लेखातील सर्व उल्लेखाची शेवटी संदर्भसूची दिलेली असते हे सर्व उल्लेख असतात. Bibliometrices संबधीत संशोधनात या पध्दतीचा सांख्यकिय (Quantitative) मुल्यमापन आणि गुणात्मक (Qiatiative) मुल्यमापन असा उल्लेख होतो. "संशोधनपूर्ण लेख लिहितांना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास सायटेशन असे म्हणतात."Citation Analysis या पध्दतीच्या विश्लेषनाच्या संबंध हा कोण कोणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो त्याच्याशी आहे.

प्रस्तुत संशोधनात केवळ स्वा.रा.ती.म. विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र या विषयांच्या पीएच. डी.प्रबंधाचा समावेश असेल. यात प्रत्येक विषयांच्या प्रतिवर्ष एक पीएच. डी.प्रबंध या प्रमाणे प्रबंधांच्या उल्लेख सूचींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**१.२ इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन:**

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ची स्थापना इ.स.१९९४ रोजी झाली आहे. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयातील विद्यार्थ्यांना पीएच.डी.मध्ये संशोधन करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये विद्यापीठ स्थापनेपासुन ते २०१७ पर्यत ६६९ संशोधक विद्यार्थ्यांनी या विषयांमध्ये पीएच. डी.प्राप्त केली आहे.प्रस्तुत संशोधनामध्ये या एकुण प्रबंधातील प्रती वर्ष एक प्रबंध या प्रमाणे ९४ प्रबंधातील २१९०३ उद्धराणांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**१.३ संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधना करीता' वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा'अवलंब केला आहे.सामाजिक शास्त्रातील संशोधनाचा एक अविभाज्य भाग म्हणून नमुना निवड पद्धत अभ्यासाचे क्षेत्र व स्वरुप लक्षात घेऊन नमुना निवड तंत्राची निवड करावी लागते. नमुना निवड पद्धतीबाबत गुड आणि हॅट असे नमूद करतात की, "नावाप्रमाणे नमुना म्हणजे समग्राचा लहानसा प्रतिनिधी होय." नमुना निवड पद्धतीमुळे वेळ, श्रम व पैसा याची बचत होत असते. वस्तुनिष्ठ व प्रातिनिधिक स्वरुपात एककाची निवड केली जाते. प्रस्तुत संशोधनाकरीता नमुना निवड प्रकारातील संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत ग्रिड पद्धतीचा अवलंब केला जाईल. या नमुना निवडीचे मुख्य कारण असे की, संभाव्यता निवड पद्धतीच्या मुलभूत अटीमध्ये समग्र उपसमग्रातील एककांची सूची व निश्चित एककांची आकडेवारी उपलब्ध झाली. त्यामुळे संभाव्यता नमुनानिवड पद्धतीचा अवलंब करणे सोयीचे मानण्यात आले. त्यामध्ये ग्रीड पद्धतही संशोधकाच्या सोयीनुसार निश्चित एकक ठरवून नमुना निवडीचा मुख्यहेतु साध्य करण्यात आला.

**१.४ संशोधनाचे उद्दिष्ये:**

- उध्दरणांचे लेखकत्व प्रकार पाहणे.
- उध्दरणांचे भाषानिहाय वितरण अभ्यासणे.
- भारतीय व परदेशातील उध्दरणांचे वितरण करणे.
- देशानुसार उध्दरणांचे भौगोलिक वितरण करणे.

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानव्यविद्याशाखेअतर्गत येणाऱ्या इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन या विषयांच्या पीएच. डी प्रंबधांच्या उल्लेखांचे विश्लेषण करण्यात आले.


**१.५उध्दरणांचे लेखकत्व प्रकार:**

इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयाच्या पीएच. डी प्रबंधांतील २१९०३ उध्दरणे आहेत या सर्व उध्दरणांना एक लेखक, दोन लेखक, तीन लेखक, तीन लेखकांपेक्षा जास्त लेखक यांनी उध्दृत केले आहे हे दर्शवणारा तक्ता क्रं.१.५आणि आलेख क्रं १.५ याव्दारे स्पष्ट केले.


**तक्ता क्रं.१.५ उध्दरणांचे लेखकत्व प्रकार**

| अ. क्र. | लेखक | उध्दरणांची संख्या | उध्दरणांची टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १. | एक लेखक | १४०७६ | ६४.२७ |
| २. | दोन लेखक | ३०१६ | १३.७७ |
| ३. | तीन लेखक | २९९ | १.३७ |
| ४. | तीन लेखकांपेक्षा जास्त | ७० | ०.३२ |
| ५. | लेखक नसलेले | ४४४२ | २०.२८ |
| | **एकुण** | **२१९०३** | **१००%** |

आलेख क्रं.३.६.५ उध्दरणांचे लेखकत्व प्रकार




आलेख क्रं. ३.६.८ उध्दरणांचेभाषानिहाय वितरण




कोणत्याही साहित्याचे वेशिष्ट्ये हे त्याच्या प्रकाशनावरुण आणि त्या साहित्यास कोणत्या लेखकांनी लिहले आहे, त्या साहित्यांस किती लेखक आहेत जसे की, एक लेखक, दोन लेखक, तीन लेखक, तीन लेखकांपैक्षा जास्त लेखक यांनी उध्दृत केले आहे यावरुण त्या साहित्याचे वैशिष्ट्ये लक्षात येते.तक्ता क्रं.१.५आणि आलेख क्रं १.५ याव्दारे स्पष्ट होते की, एकुण २१९०३ उदाहरणांच्या साहित्यामध्ये एक लेखक उध्दृत साहित्य १४०७६ (६४.२७%) आहे तर दोन लेखक उध्दृत साहित्य हे ३०१६ (१३.७७%) ऐवढे आहे आणि तीन लेखक उध्दृत साहित्य हे २९९ (१.३७%) ऐवढ्या प्रमाणात आहे आणि तीन लेखकांपेक्षा जास्त लेखकांनी उध्दृत साहित्य हे ७० (०.३२%) प्रमाणात आहे.आणि ज्या साहित्यास लेखक नाहित असे ४४४२ (२०.२८%) साहित्य आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, बहूलेखकापेक्षा एक लेखक असलेले साहित्य अधिक प्रभावी आहे.

**१.६ उध्दरणांचे भाषानिहाय वितरण:**

इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयांच्या पीएच. डी प्रबंधातील एकुण २१९०३ उदाहरणांमध्ये वेगवगळ्या भाषेच्या साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.ते दर्शविण्यासाठी तक्ता क्रं.१.६ आणि आलेख क्रं.१.६ याव्दारे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्रं.१.६ उध्दरणांचे भाषानिहाय वितरण**

| अ. क्र. | भाषा | उध्दरणांची संख्या | उध्दरणांची टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १. | मराठी | ११००४ | ५०.२४ |
| २. | इंग्रजी | ९३०८ | ४२.५० |
| ३. | हिंदी | १५५७ | ७.११ |
| ४. | मोडी | १२ | ०.०६ |
| ५. | फारशी | ११ | ०.०५ |
| ६. | गुजराती | ०७ | ०.०३ |
| ७. | संस्कृत | ०२ | ०.००९ |
| ८. | उर्दु | ०२ | ०.००९ |
| | **एकुण** | **२१९०३** | **१००%** |

तक्ता क्रं.१.६ आणि आलेख क्रं.१.६ हे असे दर्शवितात की, २१९०३ उध्दृत केलेल्या एकुण उदाहरणांपैकी भाषेनिहाय प्रलेखांमध्ये मराठी भाषेचे ११००४ (५०.२४%) उदाहरणे आहेत. त्यानंतर इंग्रजी ९३०८ (४२.५०%), हिंदी १५५७ (७.११%), मोडी १२ (०.०६%), फारशी ११ (०.०५%), गुजराती ०७ (०.०३%), संस्कृत ०२ (०.००९%) आणि उर्दु ०२ (०.००९%). यावरुन असे स्पष्ट होते की, संशोधनसाठी मराठी भाषेच्या साहित्याचा सर्वाधिक प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे.


**१.७ भारतीय व परदेशातील उध्दरणांचे वितरण Indian and Foreign distribution of citations**

मानव्यविद्या शाखेतील इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयाच्या पीएच. डी प्रबंधातील एकुण२१९०३ उदाहरणांमध्ये भारतीय व परदेशातील उदाहरणांचे वितरण केले असता. हे दर्शविणारा तक्ता क्रं.१.७ आणि आलेख क्रं.१.७ याव्दारे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्रं.१.७ भारतीय व परदेशातील उध्दरणांचे वितरण**

| अ. क्र. | भौगोलिक स्थान | उध्दरणांची संख्या | उध्दरणांची टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १. | भारत | १३४१४ | ६१.२४ |
| २. | विदेशी | २३११ | १०.५५ |
| ३. | उपलब्ध नसलेले | ६१७८ | २८.२१ |
| | **एकुण** | **२१९०३** | **१००%** |

आलेख क्रं.१.७ भारतीय व परदेशातील उध्दरणांचे वितरण



तक्ता क्रं.१.७ आणि आलेख क्रं.१.७ व्दारे २१९०३ उदाहरणांचे भौगोलिक वेगळेपण स्पष्ट केले.त्यामध्ये भारतातील १३४१४ (६१.२४%) उध्दृत उध्दरणे आणि विदेशी २३११ (१०.५५%) उदाहरणे आहेत. तसेच भौगोलिक स्थान उपलब्ध नसलेले ६१७८ (२८.२१%) उध्दरणे आहेत. यावरुन असे स्पष्ट होते की, संशोधकांनी भारतीय प्रकाशनास जास्तीचे प्राधान्य दिले आहे.

**१.८ देशानुसार उध्दरणांचे भौगोलिक वितरण Geographical distribution of citations in Country wise**

इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयांच्या पीएच. डी प्रबंधातील एकुण २१९०३ उध्दरणांचे देशानुसार भौगोलिक वितरण दर्शविण्यासाठी तक्ता क्रं. १.८ याव्दारे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्रं.१.८ देशानुसार उध्दरणांचेभौगौलिक वितरण**

| अ. क्र. | देशांचे नाव | उध्दरणांची संख्या | उध्दरणांची टक्केवारी | रँक/ क्रमवारी |
|---|---|---|---|---|
| ०१ | भारत | १३४१४ | ६१.२४ | १ |
| ०२ | अमेरिका | १०११ | ४.६२ | २ |
| ०३ | इंग्लड | ८८० | ४.०२ | ३ |
| ०४ | ऑस्ट्रेलिया | ५६ | ०.२६ | ४ |
| ०५ | जर्मनी | ४९ | ०.२२ | ५ |
| ०६ | जपान | ४४ | ०.२० | ६ |
| ०७ | थायलंड | ४४ | ०.२० | ६ |
| ०८ | चीन | ४० | ०.१८ | ७ |
| ०९ | केनीया | २९ | ०.१३ | ८ |
| १० | फ्रान्स | २१ | ०.१० | ९ |
| ११ | फिलीपाइन्स | १९ | ०.०९ | १० |
| १२ | रशिया | १८ | ०.०८ | ११ |
| १३ | येमन | १३ | ०.०६ | १२ |
| १४ | बांग्लादेश | १० | ०.०५ | १३ |
| १५ | सिंगापुर | ०९ | ०.०४ | १४ |
| १६ | इटली | ०८ | ०.०४ | १५ |
| १७ | पाकिस्थान | ०८ | ०.०४ | १५ |
| १८ | ग्रीक | ०६ | ०.०३ | १६ |
| १९ | नेपाल | ०६ | ०.०३ | १६ |
| २० | श्री लंका | ०६ | ०.०३ | १६ |
| २१ | कोलंबीया | ०४ | ०.०२ | १७ |
| २२ | कॅनडा | ०४ | ०.०२ | १७ |
| २३ | नेपाल | ०४ | ०.०२ | १७ |
| २४ | मॅनमार | ०४ | ०.०२ | १७ |
| २५ | रशिया | ०४ | ०.०२ | १७ |
| २६ | साऊत आफ्रिका | ०३ | ०.०१ | १८ |
| २८ | स्विजरलॅंड | ०३ | ०.०१ | १८ |
| २९ | नेदरलॅंड | ०२ | ०.००९ | १९ |
| ३० | फिनलॅंड | ०२ | ०.००९ | १९ |
| ३१ | न्युझीलॅंड | ०२ | ०.००९ | १९ |
| ३२ | सिरिया | ०१ | ०.००४ | २० |
| ३३ | स्कॉटलॅंड | ०१ | ०.००४ | २० |
| ३४ | उपलब्ध नसलेले | ६१७८ | २८.२१ | |
| | **एकुण** | **२१९०३** | **१००%** | |

देशानुसार उदाहरणांचे भौगोलिक वितरण हे त्या देशातील साहित्याचा उपयोग किती प्रमाणात झाला आणि त्या देशाचे योगदान संशोधनामध्ये किती प्रमाणात आहे हे दर्शविण्यासाठी त्यांची रँक/क्रमवारी करण्यासाठी उपयोग होतो. तक्ता क्रं.१.८ असे स्पष्ट करतो की, प्रथम क्रमांकावर भारत १३४१४ (६१.२४%) सर्वाधिक प्रमाणात उदाहरणांचा उपयोग करण्यात आला.त्यांनतर अमेरिका १०११ (४.६२%), इंग्लड ८८०(४.०२%), ऑस्ट्रेलिया ५६(०.२६%), जर्मनी ४९ (०.२२%) आणि जपान व थायलंड या देशातील उध्दरणे अनुक्रमे ४४(०.२०%) आहेत. तर उपलब्ध नसलेल्या उदाहरणांची संख्या ६१७८(२८.२१%) ऐवढी आहे.

## १.९ निष्कर्ष:

- इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयांमध्ये सर्वाधिक ६४.२७% एकल लेखक तर १३.७७% दोन लेखक, १.३७% तीन लेखक, ०.३२% तीन पेक्षा जास्त लेखक तर २०.२८% लेखक नसलेले साहित्य आढळले. (तक्ता क्रं. १.५)
- ५०.२४% उदाहरणेही मराठी भाषेची आढळली तर ४२.५०% इंग्रजी, व ७.११% हिंदी, ०.०६% मोडी आणि सर्वात कमी संस्कृत व उर्दु ०.००९% आढळले. (तक्ता क्रं. १.६)
- एकुण २१९०३ उदाहरणां पैकी ६१.२४% भारतीय तर १०.५५% विदेशी उध्दरणे आढळली तर २८.२१% भौगोलिक स्थान नसलेले उध्दरणे आढळले. (तक्ता क्रं. १.७)
- ६१.२४% भारत रँक क्रंमाक एक वर सर्वाधिक उदाहरणे आढळली. त्यानंतर ४.६२% अमेरिका, ४.०२% इंग्लड, ऑस्ट्रेलिया ०.२६%, आदि देशांची उध्दरणे आढळली. (तक्ता क्रं. १.८)

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) नरगुंदे रेवती, (२००५), ***प्रलेखन आणि माहितीशास्त्र '***,युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
२) नाडगोंडे गुरुनाथ, (१९८६), ***सामाजिक संशोधन पद्धती***, फडके प्रकाशन, कोल्हापुर.
३) भांडारकर पु. ल. , (१९८७), ***सामाजिक संशोधन पद्धती***, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपुर.
४) Deshpande, M. and Rajyalakshmi, D.(१९९७), ***Citation study of dissertation in library and information science,*** Annals of Library Science and Documentation, खंड -४४, अंक -२, पृ. ४१-५३.
५) www.bamu.ac.in
६) www.inflibnet.ac.in
७) www.srtmun.ac.in
८) www.unipune.ac.in
९) www.ycmou.ac.in